पुण्यनगरी
बुधवार, ३ जून २०२६

# 'विवेकानंद'मध्ये तंबाखू विरोधी जनजागृती रॅली

## एनसीसी विभागाचा पुढाकार; तंबाखूमुक्त समाजासाठी विद्यार्थ्यांची शपथ



**कोल्हापूर :** जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्त विवेकानंद कॉलेजच्या एनसीसी विभागामार्फत जनजागृती रॅलीचे आयोजन केले होते. तंबाखू आणि तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनामुळे होणाऱ्या गंभीर आरोग्यविषयक परिणामांविषयी समाजात जागरूकता निर्माण करण्यासाठी हा उपक्रम राबवण्यात आला.

आंतरराष्ट्रीय आरोग्य संघटनेच्या आवाहनानुसार ३१ मे हा दिवस जागतिक तंबाखू विरोधी दिन म्हणून साजरा केला जातो. या निमित्ताने विवेकानंद कॉलेज ते धैर्यप्रसाद हॉल, ताराबाई पार्क या मार्गावर जनजागृती रॅली काढण्यात आली. रॅलीदरम्यान रस्त्यालगतच्या लघुविक्रेत्यांनाही तंबाखू विरोधी जनजागृतीची शपथ देण्यात आली. या उपक्रमासाठी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील, ५ महाराष्ट्र एनसीसी बटालियनचे कर्नल मानस दीक्षित, ६ महाराष्ट्र गर्ल्स बटालियनचे कर्नल विक्रम नलवडे, रजिस्ट्रार एस. के. धनवडे यांचे मार्गदर्शन लाभले.

रॅलीचे आयोजन एनसीसीप्रमुख लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा, के अरटेकर प्रा. डॉ. नम्रता नरेवाडीकर आणि विद्यार्थ्यांनी केले.